## वैयक्तिक लाभाची योजना

१. योजनेचे नांव :- धनगर समाजासाठी घरे बांधण्याची योजना.

२. योजनेचा लक्षांक (उद्दिष्ट) :- महाराष्ट्र शासन इमाव, सावशैमाप्र,विजाभज,विमाप्र कल्याण विभाग कडील शासननिर्णय नियो-२०१९/प्र.क्र.०२विजाभज-१ मंत्रालय मुंबईदिनांक ०६ सप्टेंबर २०१९ अन्वये विमुक्त जाती भटक्या जमाती -क प्रवर्गातील राज्यातील ग्रामीण भागातील धनगर समाजातील लोकांसाठी घरे बांधून देण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. सदरहू योजना राबविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करणेत आली असून लाभार्थी निवडीचे अधिकार समितीस राहतील वैयक्तिक लाभार्थी यांचे घरकुलाला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या समितीस असेल मात्र निधी वितरणासाठी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेच्या आदेशासह शासनास सादर करावे लागेल.

३. लाभाचे स्वरुप :- निवड झालेल्या लाभार्थी यांनि किमान २६९ चौ.फुट चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह घरकुलाचे बांधकाम करणे अपेक्षित आहे. घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु.१.२० लक्ष व नक्षलग्रस्त/डोंगराळ लाभार्थ्यांना रु.१.३० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. सदरचे अनुदान हे आवास सॉफ्ट Awas Soft व Public Fund I Management System (PFMS ) प्रणालीव्दारे Direct Benefit Transfer (DBT) योजनेंतर्गत लाभार्थींच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय वितरीत करण्यात येतो. तसेच घरकुल अनुदान व्यतिरिक्त स्वच्छ भारत अभियान (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु. १२०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA)अंतर्गत ९०/९५ इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी देण्यात येते. (साधारणपणे ) २६७३०/-

४. पात्रता व अटी :- लाभार्थी, प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत तयार केलेल्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) बाहेरील असावा व लाभार्थी कुटूंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. व लाभार्थ्याचे वार्षिक उत्पन्न रु. १.२० लाखापेक्षा जास्त नसावे. लाभार्थ्याकडे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले अल्पभूधारक प्रमाणपत्र असावे.लाभार्थ्याचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असावे. तसेच लाभार्थी विमुक्त जाती भटक्या जमाती -क धनगर या प्रवर्गातील असलेबाबत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र असावे.

५. अर्जाचा नमुना व अर्ज करण्याची पध्दत :- वर्ष निहाय, ग्रामपंचायत निहाय प्राप्त उद्दिष्टानुसार ग्रामसभेने पात्र केलेल्या लाभार्थ्यांचे Offline लेखी स्वरुपात ग्रामपंचायती मार्फत अर्ज स्विकारले जातात. अर्ज नमुना सोबत जोडला आहे.

६. मुदत :- वर्षनिहाय प्राप्त उद्दिष्टानुसार लाभ देणेत येतो.

# धनगर समाजाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम अंतर्गत भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी घरे बांधणी योजना

अर्जदाराचा आयडेंटी साईज फोटो

लाभार्थी अनुक्रमांक :-

| अ.क्र. | बाब/आवश्यक कागदपत्रे | तपशिल |
|---|---|---|
| 1. | लाभार्थ्याचे पुर्ण नाव | |
| 2. | संपुर्ण पत्ता संपर्क क्रमांकासह | |
| 3 | अर्जदाराची जन्मतारीख व वय | |
| 4 | सक्षम अधिकाऱ्याचे धनगर जातीचे जात प्रमाणपत्र | |
| 5 | अर्जदारास घरकूल बांधावयाचे आहे त्या जागेचा पत्ता त्या जागेचा तपशिल क्षेत्रफळ इ. | |
| 6 | स्वत:च्या मालकीचे घर आहे काय? 8 अ चा उतारा जोडावा. | |
| 7 | घराचा प्रकार 1.झोपडी 2.कच्चे घर 3.पाल | |
| 8 | वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र (मर्यादा 1.20 लक्ष रुपये) | |
| 9 | कुटुंबातील व्यक्तीची एकूण संख्या? रेशन कार्ड जोडावे | |
| 10 | आधार कार्ड क्रमांक | |
| 11 | सक्षम अधिकाऱ्याचे रहीवाशी प्रमाणपत्र | |
| 12 | लाभार्थी कुटुंब हे दारिद्रय रेषेखालील आहे काय? असल्यास दारिद्रय रेषा प्रमाणपत्र जोडावे | |
| 13 | लाभार्थी विधवा/परितक्त्या/अपंग आहे काय? असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे | |
| 14 | लाभार्थी पुरग्रस्त आहे काय? असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे | |
| 15 | कुटूंबतील कोणत्याही व्यक्तीने महाराष्ट्र राज्यात इतर कोणत्याही ठिकाणी घरकुल योजनेचा लाभ घेतला नसल्याबददलचे रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र. | |
| 16 | राष्ट्रीयकृत बँकेचा तपशिल | |
| | खाते क्रमांक:- शाखा:- | |
| | बँकेचे नाव:- IFSC code:- | |

Scanned by CamScanner

## प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञेवर असे लिहून देतो/देते की, वरील सर्व माहीती सत्य आहे व माझ्या मालकीचे अन्यत्र कोठेही पक्के घर नाही.शासकीय अनुदानातून माझ्या जागेवर बांधण्यात आलेले घराचा मी स्व:त वापर करेन.इतरांना भाडयाने देणार नाही.सदर घर मी इतरांना हस्तांतरीत अथवा विकणार नाही असे घडल्यास शासन सदर घर परत घेऊ शकेल व त्यास माझी संमती राहील

दिनांक :-

ठिकाण :- लाभार्थ्याची स्वाक्षरी/अंगठा :-

अर्जदाराचे नाव- ------------------------------

टिप :- अर्जदारास विहित नमुन्यातील अर्ज झेरॉक्स,टंकलिखित किंवा हस्तलिखित स्वरूपात करता येईल

*********************************************************************************

(कार्यालयीन उपयोगासाठी)

1. अर्जदाराने दिलेली माहीती व कागदपत्रे छाननीअंती बरोबर असल्याचे आढळून येते.
2. प्रथम येईल त्यास प्रथम या तत्वावर अर्जदाराच्या अर्जाचा अनुक्रमांक हा असल्याने घरकूलासाठी पात्र/ अपात्र ठरवण्यात येत आहे.
3. लाभार्थी SECC-2011 च्या यादीच्या बाहेरील असल्याची खात्री करण्यात आली आहे.

( ) ( )

ग्रामसेवक
ग्रामपंचायत --------------------
तालुका-----------------जि सांगली

गट विकास अधिकारी
पंचायत समिती----------------
तालुका-----------------जि सांगली

*********************************************************************************

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

1. सक्षम प्राधिका-याने दिलेला जातीचा दाखला (साक्षांकीत प्रत)
2. सक्षम प्राधिका-याने दिलेला उत्पन्नाचा दाखला ( उत्पन्न् मर्यादा 1 लक्ष 20 हजार )
3. सक्षम प्राधिकारी रहीवाशी दाखला
4. रेशन कार्ड झेरॉक्स
5. अर्जदार ज्या जागेवर घर बांधत आहे ती जागा स्वमालकीची असल्याबाबत 7/12 उतारा किंवा मालमत्ता नोंदणीपत्र (पी.आर.कार्ड)ग्रामसेवक यांचा घरकूल बांधकामासाठी जागा उपलब्ध असलेबाबत दाखला
6. आधार कार्ड/मतदान कार्ड
7. राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स (IFSC code नमूद असावे )
8. लाभार्थी बेघर किंवा कच्चे घर असलेबाबत ग्रामसेवक दाखला
9. कुटूंबतील कोणत्याही व्यक्तीने महाराष्ट्र राज्यात इतर कोणत्याही ठिकाणी घरकुल योजनेचा लाभ घेतला नसल्याबददलचे रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र.
10. ज्या जागेवर घर बांधावयाचे आहे त्या जागेचा / कच्च्या घरांचा वर्ग 3 अधिकार-यासमवेत लाभार्थ्याचा फोटो व ग्रामसभा ठराव

*टिप –सोबत जोडत असलेली कागदपत्रे लाभार्थ्यांनी स्वयंसाक्षांकीत करावीत (प्रत्येक कागदपत्रावर स्वाक्षरी करावी)

Scanned by CamScanner